# SPECTRA
## INDUSTRIES LIMITED

Tel.: 2889 3933, 77 Fax : 91-22-2889 1342
E-mail : spectragrp@gmail.com
Website : www.spectraindustries.in

Plot No. 9, Spectra Compound, 4th Floor,
Ramchandra Lane Extn., Kanchpada II,
Malad (West), MUMBAI - 400 064.

CIN : L74999MH1992PLC067849

To,
The General Manager
**BSE Limited**
Phiroz Jeejeebhoy Towers, Dalal Street,
Mumbai 400 001

**Date: June 19, 2023**

**Script: 513687**

Dear Sir,

**Sub: Copy of the Form A- Public Announcement**

This has reference to our letter June 16, 2023, we are enclosing herewith the copy of the Public Announcement in Form A (under regulation 6 of the Insolvency and Bankruptcy Board of India) given by Interim Resolution Professional Mr. Kamal Kishor Gurnani, in the English & Marathi Newspapers.

Please take the same on your record.

Thanking you,

Yours faithfully,

**For Spectra Industries Limited**

Rakhi Patwa
**Company Secretary**

SPECTRA INDUSTRIES LIMITED MUMBAI

**Encl : Form A, Newspaper copies**

**FORM A**

**PUBLIC ANNOUNCEMENT**

[Under Regulation 6 of the Insolvency and Bankruptcy Board of India (Insolvency Resolution Process for Corporate Persons) Regulations, 2016]

**FOR THE ATTENTION OF THE CREDITORS OF SPECTRA INDUSTRIES LIMITED**

| **RELEVANT PARTICULARS** | | |
|---|---|---|
| 1. | Name of Corporate Debtor | SPECTRA INDUSTRIES LIMITED |
| 2. | Date of Incorporation of Corporate Debtor | 23/07/1992 |
| 3. | Authority under which Corporate Debtor is Incorporated / Registered | Registrar of Companies, Mumbai |
| 4. | Corporate Identity Number / Limited Liability Identification Number of Corporate Debtor | L74999MH1992PLC067849 |
| 5. | Address of the Registered Office and Principal Office (If any) of Corporate Debtor | Plot No.9, Spectra Compound, Kanchpada-2, Malad (W), Mumbai – 400064 |
| 6. | Insolvency Commencement Date in respect of Corporate Debtor | As per order of NCLT, Mumbai Bench dated June 16, 2023 in C.P.(IB) No. 3788 of 2019 |
| 7. | Estimated date of closure of Insolvency Resolution Process | December 13, 2023<br>(180 days from the Insolvency Commencement date which is June 16, 2023) |
| 8. | Name and Registration Number of the Insolvency Professional acting as Interim Resolution Professional | **Name:** Mr. Kamal Kishor Gurnani<br>**Registration No:** IBBI/IPA-001/IP/P-01463/2018-2019/12338 |
| 9. | Address and E-mail of the Interim Resolution Professional, as registered with the Board | **Address:** Flat No. 402, Building No. 23E, Palazzio CHS Ltd., Mahada Housing Society, Powai, Mumbai-400076.<br>**Email Id:** kamalgurnaniip@gmail.com |
| 10. | Address and E-mail to be used for correspondence with the Interim Resolution Professional | **Address:** Renascence Insolvency Resolution Professionals Private Limited, 101, Kanakia Atrium 2, Cross Road A, Chakala MIDC, Andheri East, Mumbai – 400093.<br>**Email Id:** cirp.spectra@rirp.co.in , kamal@rirp.co.in |
| 11. | Last date for submission of claims | June 30, 2023<br>Date of appointment of IRP is June 16, 2023. 14 days from receipt of order for appointment of IRP i.e., from June 16, 2023 is given for submission of claim. |
| 12. | Classes of creditors, if any, under clause (b) of sub-section (6A) of section 21, ascertained by the interim resolution professional | NIL |
| 13. | Names of Insolvency Professionals identified to act as Authorised Representative of creditors in a class (Three names for each class) | Not Applicable |
| 14. | (a) Relevant Forms and (b) Details of authorized representatives are available at: | https://ibbi.gov.in/home/downloads |

Notice is hereby given that the National Company Law Tribunal, Mumbai Bench has ordered the commencement of a Corporate Insolvency Resolution Process for **Spectra Industries Limited** on June 16, 2023.

The creditors of **Spectra Industries Limited** are hereby called upon to submit their claims with proof on or before June 30, 2023 to the Interim Resolution Professional at the address mentioned against Entry No. 10.

The financial creditors shall submit their proof of claims by electronic means only. All other creditors may submit the proof of claims in person, by post or electronic means.

**Submission of false or misleading proofs of claim shall attract penalties.**

**Sd/-**

**Date: June 18, 2023** **Kamal Kishor Gurnani**

**Place: Mumbai** **Interim Resolution Professional**

**Registration No. IBBI/IPA-001/IP/P-01463/2018-2019 /12338**

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# अपघातानंतर आत्मपरीक्षण होईल का?

भारतीय रेल्वेला या देशाची जीवनवाहिनी म्हटले जाते. आणि ते खरेही आहे. जवळपास जगातील सर्वात मोठे रेल्वेचे जाळे भारतामध्ये आहे. अनेक अर्थांनी रेल्वेची उपयुक्तता सांगता येते. प्रवासी वाहतूक हा तर त्याचा मुख्य उद्देश आहेच. शिवाय लाखो टन मालाची ने आण देशाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत बऱ्याच प्रमाणात जलद गतीने आणि कमीत कमी खर्चात केली जाते. म्हणजे भारताच्या अर्थव्यवस्थेतले रेल्वेचे योगदान अनन्यसाधारण आहे. परंतु एकूणच भारताची समाजरचना लक्षात घेतली तर ही रेल्वे देशाच्या जीवनव्यवस्थेचा किती महत्वपूर्ण भाग आहे हेसुद्धा लक्षात येते. बरोबर पंधरा दिवसांपूर्वी ओडिसातल्या बालासूरला रेल्वेचा भीषण अपघात झाला. जवळपास तीन गाड्या एकमेकांवर आदळून झालेल्या अपघातात आतापर्यंत तीनशे लोक मृत्युमुखी पडले असावेत. आणि नऊशे लोक जखमी झाल्याचेही स्पष्ट झाले होते. अपघाताची भीषणता लक्षात घेतली तर त्यामागची कारणे चौकशीअंती स्पष्ट होतील. परंतु मृत्युमुखी पडणाऱ्यांची आणि जखमी होणाऱ्यांची संख्या पाहिल्यानंतर रेल्वेचे अपघात आणि त्याच्याशी संबंधित सामाजिक जीवनव्यवस्थेचा संदर्भ लक्षात घ्यावा लागेल. आजही भारताच्या अनेक भागांमध्ये सगळ्या रेल्वे गाड्या तुडुंब भरून वाहत असतात. आणि या रेल्वे प्रवाशांचे जर वर्गीकरण केले तर त्यामध्ये ५० टक्के हा रोजगारासाठी इकडे तिकडे भटकणारा मजूर किंवा रोजंदार वर्ग असतो. जो अगदी काशीपासून कलकत्त्यापर्यंत किंवा मुंबईपासून कन्याकुमारीपर्यंतच्या अनेक स्थलांतरीत होणाऱ्या कामगारांचेही दर्शन घडवतो. रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रवासी संख्येमध्ये रोज ५० टक्के वर्ग हा अशा रोजगारासाठी स्थलांतरित होणाऱ्यांचा असतो. त्यांची जीवन जगण्यासाठी सुरू असलेली ही तारांबळ म्हणजे आपल्या मूळ गावापासून शेकडो मैल लांब असलेल्या राज्यांमध्ये जाऊन पोटापुरते पैसे कमावण्याची धडपड दुर्लक्षित करता येत नाही. बालासूरमधल्या ज्या दोन प्रवासी गाड्यांची टक्कर झाली, त्यातले चार ते पाच डबे हे आरक्षण नसलेले म्हणजेच अनारक्षित डबे होते आणि ते अशा रोजगारासाठी जाणाऱ्या मजूर वर्गानीच भरलेले होते.

### स्थलांतरितांचे अपघाती जीवन

ही वस्तुस्थिती लक्षात घेतली तर या मजूरांकडे रेल्वेचे आरक्षण करण्याइतकेसुद्धा पैसे नसतात. पैसे वाचवण्यापासून ते धावाधाव करत कामाचे ठिकाण गाठण्याचा त्यांचा आकांत लक्षात घेतला तर या डब्यांमध्ये होणारी गर्दीसुद्धा अंगावर काटा उभा करते. मुळातच ज्यांचा जीवनप्रवास म्हणजे काट्याकुट्यांवर चालणाऱ्या आयुष्यासारखा असतो. त्यातही जेव्हा असे अपघात घडतात. तेव्हा त्यांच्या जगण्याचे संदर्भ हे समाज व्यवस्था म्हणून प्रकर्षाने समोर येतात. मिळालेले आयुष्य धडपणे जगता येत नसताना अशा प्रकारचे अपघात होणे म्हणजे त्यांच्या जीवनाच्या भयंकर वेदनेचा परिपाकच म्हणावा लागतो. अपघात म्हणून या सगळ्या प्रकाराकडे बघत असताना जी रेल्वे समाजजीवनाची जीवनवाहिनी आहे, त्याच रेल्वेतली ही जीवघेणी कहाणी नाकारून चालणार नाही. रेल्वेप्रवासाची अनिवार्यता, तिचे अर्थव्यवस्था आणि समाजव्यवस्थेतले महत्व मान्य करीत असताना यातून पुढे येणारे एक विदारक समान चित्रसुद्धा लक्षात घ्यावे लागेल. आजही बिहार, पश्चिम बंगाल, ओडिसा, उत्तर प्रदेश, तामिळनाडू या राज्यातून प्रचंड प्रमाणात हा मजूर वर्ग आपल्या रोजगारासाठी स्थलांतरित होत असतो. सखोलपणे जर त्याचा आढावा घेतला तर प्रत्येक मोठ्या महानगरात परराज्यातून येणाऱ्या या स्थलांतरीतांचे प्रमाण एकाअर्थी धक्कादायक ठरते. आपापल्या गावात किंवा अगदी जिल्ह्यातसुद्धा ओडिसात रोजगार मिळत नसल्याने साक्षरतेचेही प्रमाण समाधानकारक नसल्याने त्यांना करावी लागणारी ही ससेहोलपट एका अस्वस्थ आणि परावलंबी जीवनाचा कठोर भाग ठरते. त्यांच्या प्रवासाची रेल्वेतून होणारी व्यवस्था हा त्यांच्यासाठी दिलासादायक भाग असतो. पण रेल्वेचे एवढे मोठे जाळे निर्माण होऊनही देशाच्या त्या त्या राज्यांमध्ये लोकांना पुरेसा स्थानिक रोजगार मिळू नये, हीदेखील तितकीच मोठी शोकांतिका आहे. या परावलंबी जीवनाच्याबाबतीत एवढेच म्हणता येईल की त्यांचे जीवनसुद्धा जोखीम स्वीकारलेला प्रवास ठरतो. किंवा त्यांना अपघातानेच मिळालेले हे जीवन कठोरतेतच त्यांना व्यतित करावे लागते.

### मुंबई आणि लोंढे

स्थलांतरित किंवा परराज्यातून येणाऱ्या लोकांच्या संख्येविषयी सरकारने कधीही गांभीर्याने विचार केलेला नाही. मुंबईच्याबाबतीत तर ही बाब अनेकवेळेला सिद्ध झालेली आहे. मुंबईत येणाऱ्या परप्रांतियांचे लोंढे हा आता केवळ मुंबईपुरता प्रश्न राहिलेला नाही तर तो आता महाराष्ट्रव्यापी झालेला आहे. कोकणापासून ते कोल्हापूरपर्यंत किंवा नागपूरपासून मुंबईपर्यंत परराज्यातील लोक रोजगारासाठी विखुरलेले पाहायला मिळतात. ही संख्या दिवसेंदिवस वाढते आहे. कोरोनाच्या काळात या स्थलांतरितांची वस्तुस्थिती सरकारच्याही समोर आली. रेल्वेगाड्याच उपलब्ध नसल्याने लाखो स्थलांतरीतांनी पायी प्रवास करून आपापली गावे गाठली होती. तोच प्रकार दिल्लीच्याही बाबतीत घडला. मोठ्या महानगरांमध्ये येणारे हे स्थलांतरित रोजगारासाठी येतात किंवा त्यांना रोजगार मिळतो. ही काही समाधानाची गोष्ट ठरत नाही. त्यांना नाईलाजाने आपले गाव सोडून अत्यंत विपरीत आणि हलाखीत महानगरे गाठावी लागतात. तिथेही ज्या वसाहतींमध्ये त्यांना राहावे लागते तिथली परिस्थिती फारशी समाधानकारक नसते. या सगळ्या गोष्टी एकूणच सामाजिक जीवनव्यवस्थेचा भाग ठरतात. ज्या बालासूरच्या रेल्वे अपघातातून चार ते पाच अनारक्षित डबे विखुरले गेले आणि एकूण मृतांमध्येसुद्धा याच स्थलांतरितांची आणि मजूरांची संख्या बरीच असल्याचे सांगितले जाते. म्हणूनच जीवनवाहिनी असलेल्या या रेल्वेच्या अपघाताच्यानिमित्ताने एकूणच समाजजीवन व्यवस्थेविषयी तितक्याच मोठ्या आत्मपरीक्षणाची गरज वाटू लागते. तसे आत्मपरीक्षण करण्याचे धाडस केंद्र सरकार आणि त्या त्या राज्यांची सरकारे दाखवणार आहेत का. आपापली राज्ये रोजगारासाठी स्वयंपूर्ण करणार आहेत का हा खरा प्रश्न आहे.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी.
मोबा.९४२२४२०६११

**डोळ्यात स्वप्नं असलेली माणसं खिशात पैसा असलेल्या माणसांपेक्षा जास्त श्रीमंत असतात.**

## पंचांग

**रविवार, १८ जून २०२३**
**शक १९४५ शोभननामसंवत्सर**




**ज्येष्ठ अमावास्या**
**नक्षत्र : मृग**

**-: जन्मराशी :-**
००-०१ ते ०५-१२ वृषभ
०५-१३ ते २४-०० मिथुन

**रवी उदय- ०६-०३**
**रवी अस्त- १९-१७**

**अमावस्या सकाळी १०.०६ पर्यंत, जागतिक फादर्स डे**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे**

संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल navakal.1923@gmail.com
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
REGD. No. MH/MR/SOUTH-143/2012-14
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande**

## पाककृती

### चिकन मशरूम सूप



★ **साहित्य-** चार ते पाच मशरूम, कोथिंबीर, पातीचे कांदे, चिकनचा मोठा तुकडा (लेग पिस), पाच ते सहा कप पाणी, दोन चमचे लोणी, चवीपुरते मीठ, अर्धा चमचा मिरपूड.

★ **कृती-** चिकनचे बारीक तुकडे करून त्यांना एका पातेल्यात पाणी घेऊन शिजवायला टाका. शिजवल्यानंतर ते पाणी गाळून घ्या. शिजलेल्या चिकनचे आणखीन बारीक बारीक तुकडे करावे. एका कढईत लोणी टाकून त्यावर मशरूमच्या चकत्या परतून घ्या. त्यानंतर लसणाच्या पाकळ्या परता. कापलेले पातीचे कांदे त्यात टाका व परतवा. त्यावर झाकण ठेवून एक वाफ येऊ द्या. त्यानंतर गाळलेलं चिकनचे पाणी त्यात टाका. त्यानंतर त्यात बारीक केलेले चिकनचे शिजलेले तुकडे, मिरपूड, कोथिंबीर, मीठ टाकून तयार झालेले सूप चांगल्या प्रकारे उकळू द्या.

# बांगलादेश संघाने कसोटीत इतिहास रचला अफगाणिस्तानवर ५४६ धावांनी मोठा विजय

**ढाका येथील शेर-ए-बांगला नॅशनल स्टेडियमवर पार पडलेल्या एकमेव कसोटी सामन्याच्या चौथ्या दिवशी आज बांगलादेश संघाने अफगाणिस्तानचा ५४६ धावांनी पराभव केला. २१ व्या शतकातील कसोटी क्रिकेटमधील हा सर्वात मोठा विजय मिळत इतिहास रचला. बांगलादेशचा फलंदाज नजमुल हुसेन शांतोला सामनावीर म्हणून घोषित करण्यात आले. त्याने पहिल्या डावात १४६ धावा तर दुसऱ्या डावात १२४ धावा केल्या होत्या.**



■ ढाका

**बांगलादेशने** नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. बांगलादेशने आपल्या पहिल्या डावात ३८२ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात अफगाणिस्तानचा संघ १४६ धावांवर गारद झाला. यानंतर बांगलादेशने दुसऱ्या डावात ४ विकेटच्या मोबदल्यात ४२५ धावा करत अफगाणिस्तानला केवळ ११५ धावांत गुंडाळले. अशाप्रकारे बांगलादेशने ५४६ धावांनी मोठा विजय नोंदवला. कसोटी क्रिकेटमध्ये धावांच्या बाबतीत बांगलादेशचा आता तिसरा सर्वात मोठा विजय आहे. या विक्रमी यादीत इंग्लंड पहिल्या तर ऑस्ट्रेलिया दुसऱ्या क्रमांकावर आहे. १९२८ मध्ये इंग्लंडने ६७५ धावांनी विजय मिळवला होता. त्याचवेळी ऑस्ट्रेलियाने १९३४ मध्ये कसोटी सामना ५६२ धावांनी जिंकला होता. अफगाणिस्तानविरुद्धच्या एकमेव कसोटीत बांगलादेशच्या फलंदाज आणि गोलंदाजांनी चमकदार कामगिरी केली. पहिल्या डावात सलामीवीर महमुदल हसनने ७६ आणि तिसऱ्या क्रमांकाचा फलंदाज नजमुल हुसेन शांतोने १४६ धावांचे योगदान दिले. त्याचवेळी मुशफिकुर रहीमने ४७ आणि मेहंदी हसन मिराजने ४८ धावा केल्या. यानंतर वेगवान गोलंदाज इबादत हुसेनने गोलंदाजीत चार बळी घेतले. दुसरीकडे तैजुल इस्लाम, मेहंदी हसन मिराज आणि शरीफुल इस्लाम यांना प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या. याशिवाय मोमिनुल हकने १२१ धावा केल्या. त्याचवेळी सलामीवीर झाकीर हसनने ७१ आणि कर्णधार लिटन दासने नाबाद ६६ धावा केल्या. गोलंदाजीत तस्किन अहमदने ४ आणि शरीफुल इस्लामने तीन बळी घेतले. इबादत हुसेन आणि मेहंदी हसन मिराज यांना प्रत्येकी एक बळी मिळाला.

## भारतीय क्रिकेटपटू अहंकारी अँडी रॉबर्टस यांचे वक्तव्य



■ लंडन

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशीच्या अंतिम सामन्यात पराभूत झालेल्या भारतीय क्रिकेट संघावर वेस्ट इंडीजच्या दिग्गज माजी किक्रेटपटू अँडी रॉबर्टस यांनी जोरदार टीका केली. भारतीय क्रिकेटपटू अहंकारी झाले आहेत असे देखील अँडी रॉबर्टस यांनी म्हटले.


भारतीय क्रिकेट संघातील खेळाडू जगातील इतर संघांना कमी लेखत आहेत. भारतीय संघाला आपल्या खेळावर लक्ष केंद्रीत करावे लागणार आहे. भारताकडे काही चांगले खेळाडू आहेत, पण त्यांना देशाबाहेर चांगली कामगिरी करता येत नाही. मला अपेक्षा होती की, भारताने त्यांचे फलंदाजीतील पराक्रम दाखवावे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशीपच्या अंतिम सामन्यात भारतीय खेळाडूंनी अपेक्षेप्रमाणे कोणताही चमकदार केला नाही. अजिंक्य रहाणेने कठोर संघर्ष केला असला तरी त्याच्या हाताला दुखापत झाली. संघातून अश्विनला वगळणे हास्यास्पद होते. तो एक चांगला फिरकीपटू आहे. तो केव्हाही सामना फिरवू शकतो. ही क्षमता त्याच्यात असल्याचे अँडी रॉबर्टस यांनी सांगितले.

## प्रणॉयचा पराभव

■ जकार्ता

**इंडोनेशिया** बॅडमिंटन ओपनमध्ये एकेरी पुरुषाच्या उपांत्य फेरीत भारताचा सातव्या मानांकित एच. एस. प्रणॉयचा पराभव झाला. त्याच्यावर डेनमार्कच्या व्ही. एक्सेलसेनने २१-१५, २१-१५ असा विजय मिळवत इंडोनेशिया बॅडमिंटन ओपनच्या उपांत्य फेरीत धडक मारली आहे. ही उपांत्य फेरी रविवारी होणार आहे.

## हरियाणाच्या अंजलीने सुवर्णपदक पटकावले




■ नागपूर

**हरियाणाच्या** अंजली देवीने ६२ व्या सीनिअर आंतरराज्य ॲथलेटिक्स स्पर्धेत महिलांच्या ४०० मीटर शर्यतीत ५१.४८ सेकंदांत सुवर्णपदक जिंकले आणि आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी आपले तिकीटही पक्के केले. या शर्यतीत प्रथम ४ धावपटूंनी आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी पात्रता निश्चित केली असून त्यात चौथे स्थान मिळविणाऱ्या महाराष्ट्राच्या ऐश्वर्या मिश्राचाही समावेश आहे.

अंजलीने प्राथमिक, उपांत्य शर्यतीतही आशियाई स्पर्धेची पात्रता पार केली होती. अंतिम शर्यत सुरू झाल्यावर तिने वेग घेण्यास सुरुवात केली. शेवटच्या टप्प्यांत हरियाणाच्याच हिमांशी मलिकने तिला गाठण्याचा प्रयत्न केला. मात्र, तोपर्यंत अंजलीने अंतिम रेषा पार केली होती. २१ वर्षांच्या हिमांशीने ५१.७६ सेकंदांत रौप्य, तर तमिळनाडूच्या व्ही. वित्या रामराजने ५२.४९ सेकंदांत कांस्यपदक जिंकले. ऐश्वर्याने ५२.७ सेकंद अशी वेळ दिली. पात्रता ५२.९६ सेकंद अशी आहे. चौघींनी पात्रता गाठल्याने ऐश्वर्याची वैयक्तिक चारशे मीटरसाठी निवड होण्याची शक्यता कमी असली तरी ४-४०० मीटर रिले शर्यतीसाठी निवड निश्चित आहे.

**जाहीर सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येते की, आम्ही श्री. वेजेश तिलकराम अगरवाल यांच्या ४०९/४१०, लालवाडी शिंदेवाडी रोड, ऑफ एस टी रोड, चेंबूर, मुंबई - ४०० ०७१ येथे स्थित गाव चेंबूरच्या प्लॉट क्र. २८, सर्व्हे क्र. ४०९ आणि ४१०, सीटीएस क्र. १७७६/९ धारण केलेल्या जमिनीवर बांधलेल्या भारत तिर्थ सीएचएस लि. या संस्थेमधील तळमजला + २ मजले समाविष्ट बंगलो क्र. ५८ व त्यासह डॉ. सुरेश सुंदर आणि डॉ. सतिश सुंदर यांनी संपादित केलेल्या (ज्यांनी ते श्री. मणीराम कांदेथ सुंदर यांचे कायदेशीर वारस या क्षमतेमध्ये सौ. सांथा सुंदर यांच्याकडून संपादित केले होते) दिनांक ३१.०५.१९७२ रोजीच्या प्रमाणपत्र क्र. ४८ नुसार भाग क्र. २३६ ते २४० (दोन्ही समाविष्ट) असलेल्या रु. ५०/- प्रत्येकीचे संस्थेचे ०५ समभाग धारण केलेल्या मालमत्तेच्या शीर्षकाची तपासणी करीत आहोत.
उपरोल्लेखित जागा किंवा तिच्या भागाच्या संबंधात विक्री, अदलाबदल, गहाणवट, प्रभार, भेट, देखभाल, वारसा, ताबा, भाडेपट्टी, भाडेकरू, धारणाधिकार, परवाना, हायपोथिकेशन, शीर्षकाचे किंवा कोणत्याही न्यासाअंतर्गत लाभार्थी हितसंबंधाचे हस्तांतरण, वहिवाटीचा हक्क, किंवा पूर्व-खरेदीचा हक्क किंवा कोणत्याही करारपत्र किंवा इतर व्यवस्थेअंतर्गत किंवा कोणत्याही हुकूम, आदेश किंवा निवाड्याअंतर्गत किंवा अन्यथा कशाही प्रकारे दावा असणाऱ्या व्यक्तीने त्याबाबत लेखी स्वरुपात सहाय्यक कागदपत्रांसह निम्नस्वाक्षरीकारांना त्यांच्या ३१०, साई चेंबर्स सांताक्रुझ रेल्वे स्थानक पूर्व जवळ, मुंबई ४०००५५ येथील कार्यालयात सदर प्रसिद्धीच्या ७ दिवसांच्या (दोन्ही दिवस समाविष्ट) कालावधीमध्ये सूचित करावे, असे न केल्यास अशा व्यक्ती(र्त्तीं)चा दावा सोडून दिला आणि/ किंवा गुंडाळून ठेवला असे समजण्यात येईल.
दिनांक १८ जून, २०२३
मे. एके लीगल पार्टनर्स, ॲडव्होकेट

**फॉर्म ए**
**जाहीर उद्घोषणा**
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरीपणा मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ६ अन्वये)

**स्पेक्ट्रा इंडस्ट्रीज लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

**संबंधित तपशील**

| | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव | स्पेक्ट्रा इंडस्ट्रीज लिमिटेड |
| २. | कॉर्पोरेट ऋणकोच्या स्थापनेचा दिनांक | २३.०७.१९९२ |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना/नोंदणीकरण झाले | कंपनी निबंधक, मुंबई |
| ४. | कॉर्पोरेट ऋणकोचा कॉर्पोरेट ओळख क्र./ मर्यादित दायित्व ओळख क्र. | L74999MH1992PLC067849 |
| ५. | कॉर्पोरेट ऋणकोच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | प्लॉट क्र. ९, स्पेक्ट्रा कंपाऊंड, कांचपाडा-२, मालाड (प), मुंबई - ४०००६४. |
| ६. | कॉर्पोरेट ऋणकोच्या संदर्भात दिवाळखोरी सुरु होण्याचा दिनांक | सी.पी.(आयबी) क्र. ३७८८/२०१९ मध्ये एनसीएलटी, मुंबई खंडपीठाच्या दिनांक १६ जून, २०२३ रोजीच्या आदेशानुसार. |
| ७. | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा अंदाजित दिनांक | दि. १३ डिसेंबर, २०२३ (दिवाळखोरी सुरु होण्याच्या दिनांकापासून १८० दिवस म्हणजेच १६ जून, २०२३) |
| ८. | अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण क्रमांक | **नावः** श्री. कमल किशोर गुरनानी **नोंदणीकरण क्र.:** IBBI/IPA-001/IP/P-01463/2018-2019/12338 |
| ९. | मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार, अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ईमेल | **पत्ताः** सदनिका क्र. ४०२, इमारत क्र. २३ई, प्लाझिओ सीएचएस लि., महाडा हौ. सोसायटी, पवई, मुंबई ४०००७६. **ईमेल आयडी:** kamalgurnaniip@gmail.com |
| १०. | अंतरिम ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ईमेल | **पत्ताः** रेनासेन्स इन्सॉल्व्हन्सी रिझॉल्यूशन प्रोफेशनल्स प्रायव्हेट लिमिटेड, १०१, कनाकिया अट्रियम २, क्रॉस रोड ए, चकाला एमआयडीसी, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०००९३. **ईमेल आयडी:** cirp.spectra@rirp.co.in, kamal@rirp.co.in |
| ११. | दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | जून ३०, २०२३ आयआरपी नियुक्तीचा दिनांक १६ जून, २०२३ आहे. आयआरपी नियुक्तीकरिता आदेश प्राप्त झाल्यापासून म्हणजेच १६ जून, २०२३ पासून १४ दिवस दावा सादर करण्याकरिता देण्यात आला आहे. |
| १२. | अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे निश्चित केल्यानुसार, कलम २१ च्या उप-कलम (६अ) च्या खंड (ब) अन्वये धनकोचे वर्ग, जर असल्यास. | काही नाही |
| १३. | वर्गामध्ये धनकोचा प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्याकरिता ठरविण्यात आलेल्या दिवाळखोरी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गामध्ये तीन नावे) | लागू नाही. |
| १४. | (अ) संबंधित अर्ज आणि (ब) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील उपलब्ध असेल | https://ibbi.gov.in/home/downloads |

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांनी **दि. १६ जून, २०२३** रोजी **स्पेक्ट्रा इंडस्ट्रीज लिमिटेडची** कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरु करण्याचे आदेश दिले आहेत.
**स्पेक्ट्रा इंडस्ट्रीज लिमिटेडच्या** धनकोंना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह दि. ३० जून, २०२३ रोजी किंवा त्यापूर्वी अंतरिम ठराव व्यावसायिक यांच्याकडे नोंद क्र. १० समोर नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.
आर्थिक धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुराव्यासहीत दावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व धनको त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करू शकतात.
**दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.**

सही/-
दिनांकः १८ जून, २०२३ — कमल किशोर गुरनानी
ठिकाणः मुंबई — अंतरिम ठराव व्यावसायिक
नोंदणीकरण क्र. IBBI/IPA-001/IP/P-01463/2018-2019/12338

**फॉर्म ए**
**जाहीर उद्घोषणा**
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरीपणा मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ६ अन्वये)

**एपिटोम रेसिडेन्सी प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

**संबंधित तपशील**

| | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव | एपिटोम रेसिडेन्सी प्रायव्हेट लिमिटेड |
| २. | कॉर्पोरेट ऋणकोच्या स्थापनेचा दिनांक | ३ जुलै, २००८ |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना/नोंदणीकरण झाले | कंपनी निबंधक, मुंबई |
| ४. | कॉर्पोरेट ऋणकोचा कॉर्पोरेट ओळख क्र./मर्यादित दायित्व ओळख क्र. | U45100MH2008PTC184241 |
| ५. | कॉर्पोरेट ऋणकोच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | वन बीकेसी, ए विंग १४०१, प्लॉट क्र. सी-६६, जी ब्लॉक, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई वांद्रे उपनगर ४०००५१. |
| ६. | कॉर्पोरेट ऋणकोच्या संदर्भात दिवाळखोरी सुरु होण्याचा दिनांक | १२ जून, २०२३ (आदेशाची प्रत १५ जून, २०२३ रोजी प्राप्त) |
| ७. | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा अंदाजित दिनांक | ०९ डिसेंबर, २०२३ |
| ८. | अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण क्रमांक | **नावः अशोक वेंकटराव बारबोले, नोंदणीकरण क्रमांकः** IBBI/IPA-001/IP-P02280/2021-2022/13720 |
| ९. | मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार, अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ईमेल | **नोंदणीकृत पत्ताः** पूजा हॉटेल समोर, अशोक हॉटेलजवळ, टिळक नगर, लातूर, महाराष्ट्र ४१३५१२. **ईमेलः** caashokbarbole2009@gmail.com |
| १०. | अंतरिम ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ईमेल | **पत्रव्यवहाराचा पत्ताः** द्वाराः इनकॉर्प रिस्ट्रक्चरिंग सर्व्हिसेस एलएलपी ४०५-४०७, हिंद राजस्थान बिल्डींग, डी.एस. फाळके रोड, दादर पूर्व, मुंबई ४०००१४. **ईमेल आयडी:** cirp.epitome@gmail.com |
| ११. | दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | २९ जून, २०२३ (आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून १४ दिवस) |
| १२. | अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे निश्चित केल्यानुसार, कलम २१ च्या उप-कलम (६अ) च्या खंड (ब) अन्वये धनकोचे वर्ग, जर असल्यास. | कलम ५(८) च्या खंड(एफ) नुसार स्थावर मालमत्ता प्रकल्पाअंतर्गत वाटप प्राप्तकर्ता. |
| १३. | वर्गामध्ये धनकोचा प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्याकरिता ठरविण्यात आलेल्या दिवाळखोरी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गामध्ये तीन नावे) | १) श्री. प्रसाद कमलाकर धारप IBBI/IPA-001/IP-P00702/2017-2018/11228 २) श्री. हिराचंद नेमिचंद बाफना IBBI/IPA-001/IP-P-01207/2018-19/11922 ३. श्री. महेश कुमार गुप्ता IBBI/IPA-001/IP-P00478/2017-18/10866 |
| १४. | (अ) संबंधित अर्ज आणि (ब) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील उपलब्ध असेल | (अ) दावा अर्ज डाऊनलोड करण्याकरिता वेब लिंक www.ibbi.gov.in/downloadforms.html (ब) पत्रव्यवहाराचा ईमेल आयडीः cirp.epitome@gmail.com |

याद्वारे सूचना देण्यात येते की, **राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण**, मुंबई खंडपीठ यांनी **आदेश क्र. सी. पी.क्र.** १३६६/आयबी/एमबी/२०२० दिनांक १२ जून, २०२३ रोजीनुसार **दि. १२ जून, २०२३** रोजी **एपिटोम रेसिडेन्सी प्रायव्हेट लिमिटेडची** कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरु करण्याचे आदेश दिले आहेत. (**अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे आदेश प्राप्त झाल्याचा दिनांक १५ जून, २०२३.**)
एपिटोम रेसिडेन्सी प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह **२९ जून, २०२३** रोजी किंवा त्यापूर्वी अंतरिम ठराव व्यावसायिक यांच्याकडे नोंद क्र. १० समोर नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.
आर्थिक धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुराव्यासहीत दावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व धनको त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करू शकतात.
नोंद क्र. १२ समोर नमूद केल्यानुसार वर्गाशी संबंधित वित्तीय कर्जदाराने, फॉर्म सीएमधील वर्गाचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम पाहण्याकरिता नोंद क्र. १३ समोर नमूद तीन दिवाळखोरी व्यावसायिकांमधून अधिकृत प्रतिनिधी म्हणून त्यांची पसंती नमूद करावी.
**दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.**

सही/-
दिनांकः १८ जून, २०२३ — **अशोक वेंकटराव बारबोले**
ठिकाणः मुंबई — एपिटोम रेसिडेन्सी प्रायव्हेट लिमिटेडचे अंतरिम ठराव व्यावसायिक
(नोंदणीकरण क्र. IBBI/IPA-001/IP-P02280/2021-2022/13720)